**वाचले :** १. राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांचे प्रसिध्दी पत्रक दिनांक ४ नोव्हेंबर, २०२५.

२. महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दिनांक २६.११.२०२५ च्या असाधारण भाग एक-मध्य उप-विभाग मध्ये प्रकाशित सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई अधिसूचना क्र. सार्वसु-११२५/प्र.क्र.२२९/जपुक (२९), दिनांक २६.११.२०२५.

३. मा. उच्च न्यायालय इंग्रजी पत्र क्र. General(Adm.)/Judl./2007, दिनांक १२.०६.२००७ व त्यासोबतचे परिपत्रक दिनांक ११.०६.२००७.

- - - - - -

## - : कार्यालयीन आदेश : -

ज्याअर्थी, संदर्भात अनुक्रमांक १ येथे नमूद प्रसिध्दी पत्रकानुसार राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांनी मंगळवार, दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी नांदेड जिल्हा न्यायिक विभागातील खाली नमूद (१३) नगरपरिषदा अथवा यथास्थिती नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूका घोषित केल्या आहेत,

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | बिलोली | २. | देगलूर | ३. | धर्माबाद |
| ४. | हदगांव | ५. | हिमायतनगर | ६. | कंधार |
| ७. | कुंडलवाडी | ८. | मुदखेड | ९. | मुखेड |
| १०. | उमरी | ११. | भोकर | १२. | किनवट |
| १३. | लोहा. | | | | |

आणि ज्याअर्थी, संदर्भात अनुक्रमांक २ येथे नमूद अधिसूचनेनुसार वर नमूद निवडणूकांच्या अनुषंगाने मंगळवार, दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी त्या त्या नगरपरिषद / यथास्थिती नगर पंचायतींच्या मतदारसंघात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे,

त्याअर्थी, सर्व संबंधितांना संदर्भांकित निवडणूकीत मतदानाचा हक्क बजावणे शक्य होणेस्तव मा. उच्च न्यायालयाच्या संदर्भात अनुक्रमांक ३ येथे नमूद परिपत्रक आणि दिवाणी मार्गदर्शक पुस्तिकेच्या प्रकरण ३६ परिच्छेद ७०१

मधील तरतूदींनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी, डॉ. एस.डी.तावशीकर, प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड याद्वारे नांदेड जिल्हा न्यायिक विभागातील कुंडलवाडी वगळता उर्वरित (१२) नगरपरिषद / नगरपंचायतींच्या ठिकाणी कार्यरत सर्व न्यायालये व त्यांच्या कार्यालयांना **मंगळवार, दिनांक २ डिसेंबर, २०२५** रोजी सुट्टी जाहीर करीत आहे. ही (१२) ठिकाणे वगळता अन्य ठिकाणी कार्यरत सर्व न्यायालये व त्यांची कार्यालये मंगळवार, दिनांक २ डिसेंबर, २०२५ रोजी नियमित सुरु राहतील.

कार्यरत असलेल्या मुख्यालयाव्यतिरिक्त अन्यत्र मतदार यादीत नाव असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी त्यांचे नाव असलेल्या मतदार संघात मतदान असलेल्या दिवशी - जर ते आपला मतदानाचा हक्क बजावून कार्यालयात उपस्थित होऊ शकत नसतील तर - त्यांचे नाव असलेल्या मतदार संघातील मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जावी. अशा अधिकारी / कर्मचारी यांना तशा आशयाचा लेखी अर्ज, निवडणूक ओळखपत्राच्या प्रतीसह आपआपल्या कार्यालय प्रमुखासमक्ष सादर करावा तसेच त्यांनी मतदानोपरांत मतदान केले असल्याचे लिखीत पुष्टीकरण संबंधित कार्यालय प्रमुखासमक्ष सादर करावे.

वरीलप्रमाणे दिल्या गेलेल्या सुट्टीची भरपाई होणेस्तव अन्य सुट्टीच्या दिवशी कार्यदिन घोषित करणेबाबतचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमीत केले जातील.

जिल्हा न्यायालय, नांदेड. )
29/11/2025
) (डॉ. एस.डी.तावशीकर)

दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२५. ) **प्र. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.**

२९ अधि. (आ)

-------

- मा. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, किनवट/माहूर/हिमायतनगर/हदगांव/अर्धापूर/लोहा/देगलूर/नायगांव बाजार/मुदखेड/उमरी/धर्माबाद.
- मा. सह/दुसरे/तिसरे/चौथे/पाचवे/सहावे/सातवे सह दिवाणी न्यायाधीश,कनिष्ठ स्तर, नांदेड.
- मा. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, भोकर / कंधार / मुखेड / बिलोली / हदगांव / लोहा / किनवट.
- मा. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, मुखेड.

यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदर आदेश आपल्या अधिनस्थ सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा आणि आदेशाची एक प्रत आपल्या न्यायालयाच्या सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करावी. तसेच प्रस्तुत आदेशाची कल्पना आपआपल्या मुख्यालयी कार्यरत अभिवक्ता संघास द्यावी.

प्रति,

- प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नांदेड.
- अधिक्षक, न्यायिक आणि तांत्रिक विभाग, जिल्हा न्यायालय, नांदेड.
- सहाय्यक अधिक्षक, वित्त / निरीक्षण / अभिलेख / बांधकाम / संगणक / सांख्यिकी / जडवस्तू विभाग, न्यायासन, जिल्हा न्यायालय, नांदेड.
- वरिष्ठ लिपीक, ग्रंथालय / दिवाणी / फौजदारी / सर्वसाधारण मुद्देमाल विभाग, जिल्हा न्यायालय, नांदेड.
- सदर आदेशाची एक प्रत जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर आणि एक प्रत सूचना फलकावर डकविण्यात यावी.

जिल्हा न्यायालय, नांदेड. )
)
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२५. )

प्रबंधक, 29.11.2025
जिल्हा न्यायालय, नांदेड.

- - - - - -

**जा.क्र. आस्था / ब-४(८) / 9684 / २०२५.**

प्रतिलिपी -

- मा. महाप्रबंधक साहेब, उच्च न्यायालय, मुंबई - ४०० ०३२.
- प्रबंधक (निरीक्षण-१/२), उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई.
- प्रबंधक (प्रशासन), उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर / नागपूर / गोवा / कोल्हापूर.
- प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सर्व जिल्हे.
- जिल्हाधिकारी, नांदेड.
- विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड.
- पोलीस अधिक्षक, नांदेड.
- जिल्हा सरकारी वकील, नांदेड.
- अधिक्षक, जिल्हा कारागृह, नांदेड.
- सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, नांदेड.
- अध्यक्ष, अभिवक्ता संघ, नांदेड.

**प्र. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.**

प्रतिलिपी सविनय,

- मा. जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड / बिलोली / मुखेड / कंधार / भोकर.
- मा. जिल्हा न्यायाधीश-२/३, नांदेड.
- मा. अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश, नांदेड.
- मा. तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, कंधार.
- मा. न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, नांदेड.
- मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड / बिलोली / कंधार / भोकर / जोड न्यायालय, मुखेड.
- मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, नांदेड.
- मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड.
- मा. सह / दुसरे / तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड.